झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण SRA/CO/OW/2019/३७४९६

सहकार कक्ष, झोपुप्रा, मुंबई
जा. क्र. झोपुप्रा/ सहनिस/ कार्यासन-१/ टे.सी. ६/ सन २०१९
दिनांक : १९ /०८/२०१९.

## -: सदनिका वाटप सभेची नोटीस :-

रेडहिल, दत्तकृपा, नवचैतन्य, शिवप्रेरणा, इंद्रप्रस्थ, वायुसूत, मिलन नगर व पंचशिल एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., लालडोंगर, चेबूर, मुंबई - ४०० ०७१ या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना कळविण्यात येते की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६२ अन्वये संस्थेच्या पुनर्वसन इमारतीमधील ७३८ निवासी पुनर्वसन सदनिकांचे सोडत पध्दतीने वाटप करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील प्राधिकृत अधिकारी म्हणून माझी नियुक्ती केलेली आहे. त्यास अनुसरुन सदर पुनर्वसन सदनिकांचे वाटप **दि. २७ / ०८ /२०१९ रोजी सकाळी १० : ०० वाजता स्थळ :- बंन्टस संघ मुंबई, बंटारा भवन, भंटार भवन मार्ग, कुर्ला (पुर्व), मुंबई** - ४०० ०७७ येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी सदरच्या सदनिका वाटपास केवळ पात्र झोपडीधारकांनी उपस्थित रहावे.

## -: सभेचे विषय :-

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६२ नुसार सोडत पध्दतीने सदनिका वाटप करणे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १९ /०८/२०१९**

**(डॉ. स्मिता गायकवाड)**
**प्राधिकृत अधिकारी तथा,**
**सहायक निबंधक, सहकारी संस्था, झोपुप्रा, मुंबई.**

**टिप :**

१. सदनिका वाटप प्रस्तावामधील ज्या झोपडीधारकांचे नाव परिशिष्ट - २ मध्ये पात्र आहेत अशा व्यक्ती अंध, अपंग, विधवा महिला कुटुंब प्रमुख असतील यांच्यासाठी पुनर्वसन इमारतीमधील खालच्या मजल्यावरील त्यांनी मागणी केल्यास परिपत्रकातील तरतूदीनुसार सदनिका वाटप करण्यात येईल. त्याकरीता सदर झोपडीधारकांनी संस्थेच्या व्यवस्थापक समितीकडे तसा विनंती अर्ज करणे आवश्यक आहे. झोपडीधारक अंध व अंपग असल्यास महाराष्ट्र शासनाचा अपंगत्वाचा शासन मान्य दाखला सादर करावा. विधवा महिलांनी त्यांचे पती मयत असल्याबाबत पतीचे मृत्यू दाखल्याची छायांकित प्रत सादर करावी.
२. कृपया सदर सोडतीची नोटीस प्राप्त होणाऱ्या पात्र व्यक्ती / वैवाहीक जोडीदार यांची स्वत: ची ओळख होईल अशा ओळखपत्रासह (आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्रासह) सोडतीवेळी उपस्थित रहावे.
३. जे पात्र झोपडीधारक सदनिका वाटपास गैरहजर असतील त्यांनी त्यांना वाटप झालेल्या सदनिकांचे वाटपपत्र सदनिका वाटपानंतर १५ दिवसांत दुपारी २ ते ५ (बुधवार व शनिवार वगळून) या वेळेत प्राधिकृत अधिकारी यांचेकडे आपली ओळख पटवून सदनिका वाटप पत्र प्राप्त करावे.

**प्रति :-**
**१. श्री/ श्रीमती ---------------------------------------------------------- परिशिष्ट - २ क्रमांक ---------------------**
---------------------- एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., लालडोंगर, चेबूर, मुंबई - ४०० ०७१.
२. संस्थेचे नोटीस बोर्ड

**प्रत माहितीसाठी :-**
मा. सहनिबंधक, सहकारी संस्था (मुंबई शहर व पूर्व उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई - ४०० ०५१.